| | |
|---|---|
| CNR No.**MHPU130003972018** | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५३/२०१८**<br>**प्रभावती**<br>**वि.**<br>**अंकुश** |

**निशाणी क्र. ४३ वरील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी अर्जदार क्र. २ संजय मुरलीधर जगताप यांचे वारस अभिलेखावर घेऊन त्याप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार यांनी जाबदेणार यांचेविरुद्ध अर्ज दि.प्र.सं.आदेश ३९ नियम २ अ प्रमाणे न्यायालयाचे हुकूमाचा भंग करुन अवमान केलेबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामकाज प्रलंबित असताना अर्जदार क्र. २ संजय मुरलीधर जगताप हे दि. ०८.०३.२०२६ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयतास वादी क्र. २ अ) ते वादी क्र. २ क ) असे कायदेशीर वारस आहेत. सदरील अर्जदार क्र. २ यांचे नाव कमी करुन त्यांचे वारसांना अर्जात समाविष्ट करणे आवश्यक आहे. असे कथन करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी अर्जावर त्यांचे म्हणणे देवून योग्य ते आदेश करावेत असे कथन केले आहे.

३. अर्जदार व जाबदेणार तर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्ज व म्हणण्याप्रमाणे युक्तीवाद केला. अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार यांनी जाबदेणार यांचेविरुद्ध अर्ज दि.प्र.सं.आदेश ३९ नियम २ अ प्रमाणे न्यायालयाचे हुकूमाचा भंग करुन अवमान केलेबाबतचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे कामकाज प्रलंबित असताना अर्जदार क्र. २ संजय मुरलीधर जगताप हे दि. ०८.०३.२०२६ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयतास वादी क्र. २ अ) ते वादी क्र. २ क ) असे कायदेशीर वारस आहेत. सदरील अर्जदार क्र. २ यांचे नाव कमी करुन त्यांचे वारसांना अर्जात समाविष्ट करणे आवश्यक आहे. अर्जदार यांनी त्यांच्या कथनांच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दिले आहे. सदर अर्जाचा गुणाणुगुणावर निपटारा होण्यासाठी अर्जदार क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेतल्याने मदतच होणार आहे. अर्जदार यांचे वारस अभिलेखावर घेणे अर्जाच्या पुढील कारवाईसाठी आवश्यक आहे. अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वरील विवेचनाचा विचार करुन खालील आदेश पारीत करत आहेः–

दि.कि.अर्ज.क्र. ५३/२०१८
प्रभावती वि. अंकुश

<u>**आदेश**</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांनी पुढील तारखेपर्यंत अर्जदार क्र. २ यांचे प्रस्तावित वारस अभिलेखावर घेवून त्या अनुषंगाने अर्जात दुरुस्ती करावी.

RAVINDRA ANANDRAO SAWANT

Digitally signed by RAVINDRA ANANDRAO SAWANT
Date: 2026.07.02 17:26:08 +0530

दिनांकः ०२.०७.२०२६ **( रविंद्र आ. सावंत )**

सासवड. २ रे सह दि.न्या. क. स्तर, सासवड.

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file orders are same word for word as per original Judgment/order."

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | P. R. Shirke (Stenographer Grade III) |
| Court Name | : | Shri. R. A. Sawant<br>C.J.J.D.& J.M.F.C.,Saswad. |
| Date | : | 02/07/2026 |
| Order signed by presiding officer on | : | 02/07/2026 |
| Order Uploaded on | : | 02/07/2026 |